सन २०१७-१८ करीता राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत अनुसूचित जाती प्रवर्गाकरीता ₹ ३४.९६ कोटी निधी वितरीत करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन निर्णय क्रमांक: राकृवि ०८१७/प्र.क्र. ९४/राकृवियो कक्ष
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई - ४०० ०३२
तारीख: ०३ ऑक्टोंबर, २०१७

<u>वाचा :</u>

१. कृषि व पदुम विभागाचा शासन निर्णय क्र. ०३१७/प्र. क्र.१८/राकृवियो कक्ष, दि. १३/०४/२०१७
२. वित्त विभागाचे परिपत्रक क्र. अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दि.१८.०४.२०१७
३. कृषि व सहकारीता विभाग, केंद्रिय कृषि मंत्रालय, भारत सरकार यांचे पत्र क्र. ७-१/२०१७-आरकेव्हीवाय, दि. १५/०५/२०१७
४. कृषि व सहकारीता विभाग, केंद्रिय कृषि मंत्रालय, भारत सरकार यांचे पत्र क्र. १-१५/२०१७ आरकेव्हीवाय/१, दि. १६/०६/२०१७

<u>प्रस्तावना :</u>

राष्ट्रीय कृषि विकास योजना ही ११ व्या पंचवार्षिक योजनेंतर्गत सन २००७-०८ पासुन सुरु करण्यात आली आहे. कृषि व संलग्न क्षेत्राशी संबंधित योजनांच्या नियोजन व कार्यान्वयानामध्ये राज्यांना लवचिकता व स्वायतत्ता देणे, स्थानिक गरजेनुसार पिके व प्राधान्यक्रमाचा विचार करुन त्यांना राज्यांच्या कृषि नियोजनामध्ये स्थान देणे. पंचवार्षिक योजना काळात विकास दरामध्ये कृषि व कृषि संलग्न क्षेत्राचा विकास दर ४% गाठणे ही या योजनेची प्रमुख्य उद्दीष्ट आहेत.

राष्ट्रीय कृषि विकास योजना केंद्र व राज्य शासनाच्या अनुक्रमे ६०:४० प्रमाणात अर्थसहाय्याने राबविण्यात येत आहे. केंद्र शासनाच्या संदर्भाकित दि. १५/०५/२०१७ रोजीच्या पत्रान्वये चालू वर्षी राकृवियोंतर्गत सर्वसाधारण राकृवियोकरीता (Normal RKVY) केंद्र हिस्याचे ₹ ४०८.३२ कोटी प्रवर्गनिहाय (सर्वसाधारण प्रवर्ग ₹३२६.९९ कोटी, अनुसूचित जाती ₹४१.९६ कोटी व अनुसूचित जमाती ₹३९.३७ कोटी) व त्यास अनुसरुन समरुप राज्य हिस्याचे ₹२७२.२१ कोटी (सर्वसाधारण प्रवर्ग ₹२१७.९९ कोटी, अनुसूचित जाती ₹ २७.९७३ कोटी व अनुसूचित जमाती ₹२६.२४ कोटी) असे एकुण ₹ ६८०.५३ कोटी निधीचे नियतवाटप मंजूर केले होते.

संदर्भाधिन दि.१६ जुन, २०१७ रोजीच्या पत्रान्वये केंद्र शासनाने अनुसूचित जाती प्रवर्गासाठी राज्यास केंद्र हिस्याचा पहिल्या हप्त्यात ५० % म्हणजे ₹ २०.९८ कोटी निधी वितरीत केला आहे. त्यानुषंगाने, सदर केंद्र समरुप राज्य हिस्याचा ₹ १३.९८ कोटी निधी असे एकूण ₹३४.९६ कोटी निधी वितरणासाठी उपलब्ध आहेत. सदर निधी राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत मंजूर प्रकल्पांच्या

अंमलबजावणीकरिता चालू वर्षी अनुसूचित जाती प्रवर्गाकरिता वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती, त्यानुषंगाने शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

शासन निर्णयः

१. सन २०१७-१८ मध्ये राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत मंजूर प्रकल्पांच्या अंमलबजावणीसाठी या शासन निर्णयान्वये आयुक्त (कृषि) यांना अर्थसंकल्पिय वितरण प्रणालीद्वारे अनुसूचित जाती प्रवर्गाकरिता केंद्र व राज्याच्या ६०:४० आर्थिक सहभागाच्या प्रमाणात एकूण ₹ ३४.९६ कोटी निधी (रुपये चौतीस कोटी शहाण्णव लाख फक्त) पुढीलप्रमाणे उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

(रक्कम ₹ कोटी)

अ.क्र.	**योजनेचे नाव**	**अनुसूचित जाती प्रवर्ग**		
		केंद्र हिस्सा	**राज्य हिस्सा**	**मंजूर निधी**
१.	राष्ट्रीय कृषि विकास योजना-सर्वसाधारण राकृवियो	२०.९८	१३.९८	**३४.९६**
एकूण		**२०.९८**	**१३.९८**	**३४.९६**

२. या शासन निर्णयान्वये राष्ट्रीय कृषि विकास योजनेकरीता केंद्र हिस्याचा ₹२०.९८ कोटी (रुपये वीस कोटी अठ्यान्नव लाख फक्त) व राज्य हिस्स्याचा ₹ १३.९८ कोटी (रुपये तेरा कोटी अठ्याण्णव लाख फक्त), असा एकूण ₹ ३४.९६ कोटी निधी (रुपये चौतीस कोटी शहाण्णव लाख फक्त), सन २०१७-१८ करिता केंद्र व राज्य हिस्स्याच्या पुढील लेखाशिर्षांतर्गत अर्थसंकल्पित करण्यात आलेल्या तरतुदीतून खर्ची टाकावा -

प्रवर्ग	**केंद्र हिस्सा**	**राज्य हिस्सा**
अनुसूचित जाती	**मागणी क्रमांक डी -३** २४०१- पीक संवर्धन (००) (७८९) अनुसूचित जाती उपयोजना (००) (२९) कृषि उन्नती योजना - राष्ट्रीय कृषि विकास योजना अंतर्गत अर्थसहाय्य (पंचवार्षिक योजनेअंतर्गत योजना) (केंद्र हिस्सा ६० टक्के) (२४०१ A७२६) ३३-अर्थसहाय्य	**मागणी क्रमांक डी -३** २४०१- पीक संवर्धन (००) (७८९) अनुसूचित जाती उपयोजना (००) (३०) कृषि उन्नती योजना - राष्ट्रीय कृषि विकास योजना अंतर्गत अर्थसहाय्य (पंचवार्षिक योजनेअंतर्गत योजना) (राज्य हिस्सा ४० टक्के) (२४०१ A७३५) ३३-अर्थसहाय्य

३. या शासन निर्णयान्वये वितरीत करण्यात आलेल्या ₹ ३४.९६ कोटी रक्कमेचे कोषागारातून आहरण व वितरणाकरिता सहायक संचालक (लेखा-१), कृषि आयुक्तालय, पुणे यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत असून, आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे यांना नियंत्रण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

४. सहायक संचालक (लेखा-१), कृषि आयुक्तालय, पुणे यांनी अर्थसंकल्पिय वितरण प्रणालीद्वारे उपलब्ध झालेली ₹ ३४.९६ कोटी रक्कम कोषागारातून आहरित करुन आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या नावे उघडण्यात आलेल्या स्वीय प्रपंजी लेखा खाते (Personal Ledger Account) मध्ये जमा करावी व तसे शासनास अवगत करावे. सदर ₹ ३४.९६ कोटी निधी आयुक्त (कृषि) यांना मंजूर प्रकल्पांच्या अंमलबजावणीसाठी वर्ग करण्यात यावा, सदर निधीचे प्रकल्पनिहाय वितरणाचा आदेश स्वतंत्ररित्या निर्गमित करण्यात येईल.

५. या शासन निर्णयान्वये राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत अनुसूचित जाती करिता वितरीत करण्यात येत असलेल्या ₹ ३४.९६ कोटी निधीपैकी सद्यस्थितीत ₹ २७.२९ कोटी (रुपये सत्तावीस कोटी एकोणतीस लाख फक्त) निधीचे प्रकल्प निहाय वितरण करण्यात येत असून उर्वरीत ₹ ७.६७ कोटी निधीचे प्रकल्प निहाय वितरण यथावकाश कळविण्यात येईल. त्यानुषंगाने, पुढील विभागांच्या अधिनस्त अंमलबजावणी यंत्रणांना ₹ २७.२९ कोटी निधी वितरीत करण्यात येत असून त्याबाबतचा प्रकल्प निहाय तपशिल या शासन निर्णयासोबत जोडलेल्या **परिशिष्ट अ** मध्ये नमूद केला आहे -

(रक्कम ₹ कोटी)

अ. क्र.	अंमलबजावणी यंत्रणा	वितरीत निधी
१	आयुक्त (कृषि)	२५.०७
२	पशुसंवर्धन विभाग	१.८१
३	संचालक (रेशीम)	०.४१
एकूण		**२७.२९**

६. राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत सन २००७-०८ पासून सन २०१६-१७ पर्यंत विविध विभागांना वितरीत केलेल्या निधीचे लेखापरीक्षण होऊन तसे प्रमाणित केल्यानंतर सदर योजनेंतर्गत उर्वरीत निधी दुसऱ्या टप्प्यामध्ये केंद्र शासनाकडून वितरीत करण्यात येणार आहे, त्यामुळे सर्व अंमलबजावणी यंत्रणांनी/विभागांनी त्यांना सन २००७-०८ ते सन २०१६-१७ या कालावधीत वितरीत केलेल्या निधीचे सनदी लेखापालांकडून लेखापरिक्षण झाल्याचे प्रमाणित करावे.

७. ‘उन्नत शेती - समृद्ध शेतकरी’ या मोहिमेच्या संदर्भांकित दि. १३ एप्रिल, २०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार कृषि विभागाच्या राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत मंजूर प्रकल्पांची अंमलबजावणी करावी.

८. या शासन निर्णयान्वये केवळ ‘अनुसूचित जाती प्रवर्गाकरिता’ निधी वितरीत करण्यात आला असून सर्व विभागांनी / अंमलबजावणी यंत्रणांनी त्यांना मंजूर केलेल्या प्रकल्पांतर्गत अनुसूचित जाती प्रवर्गासाठी आवश्यक असलेल्या निधीकरिता उपरोक्त रकमेचा विनियोग करावा.

९. सर्व विभागाच्या / अंमलबजावणी यंत्रणांच्या वैयक्तिक लाभाच्या प्रकल्पांतर्गत केवळ आधार संलग्न बँक खात्यावर थेट लाभ हस्तांतरणाद्वारे (DBT) लाभार्थ्यांना अनुदान वितरीत करावे.

१०.हा शासन निर्णय वित्त विभागाचे परिपत्रक क्र.अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दि. १८.०४.२०१७ नुसार विहीत केलेल्या अटींची पुर्तता होत असल्याने तसेच, सदर परिपत्रकानुसार या विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांनुसार तसेच सामाजिक न्याय विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्र. १६४-विघयो, दि. १७ सप्टेंबर, २०१७ अन्वये प्राप्त झालेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

११.सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१००३१३४८३१०८०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

सहपत्र :- परिशिष्ट अ

Shrikant Chandrakant Andge

Digitally signed by Shrikant Chandrakant Andge
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture And ADF Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=5d5ab93b4e4f2fcd87e12fe19b8965025d482b1bee0fffaa62085c34db6bfd8c, serialNumber=d8d9626c9e038380cd235c048f20d7ce74cffd3a95f2ac3c192e9c991f358271, cn=Shrikant Chandrakant Andge
Date: 2017.10.03 13:38:07 +05'30'

(श्रीकांत चं. आंडगे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत ,

१. प्रधान सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. अपर मुख्य सचिव (वित्त), मंत्रालय, मुंबई
३. प्रधान सचिव (नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
६. आयुक्त (पशुसंवर्धन), पुणे
७. संचालक (विस्तार व प्रशिक्षण), कृषि आयुक्तालय, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे.
८. संचालक (प्रक्रिया व नियोजन), कृषि आयुक्तालय, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे.
९. संचालक, राष्ट्रीय फलोत्पादन अभियान, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे.
१०.संचालक, (रेशीम), विभागीय आयुक्त कार्यालय परिसर, नागपूर
११.महालेखाकार (स्थानिक निकाय लेखा परिक्षा व लेखा), मुंबई.
१२.महालेखापाल (लेखा परिक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपुर
१३.सर्व जिल्हा कोषागार अधिकारी, महाराष्ट्र राज्य
१४.सहायक संचालक (लेखा-१), कृषिआयुक्तालय, पुणे
१५.वित्त विभाग (कार्या. व्यय-१ / अर्थसंकल्प), मंत्रालय, मुंबई
१६. मा. मंत्री (कृषि व फलोत्पादन) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
१७.निवड नस्ती.

परिशिष्ट - अ

कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग

शासन निर्णय क्र. राकृवि-०३१७/प्र.क्र.२३/राकृवियो कक्ष, दि.०३/१०/२०१७ चे सहपत्र

राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत प्रकल्प निहाय/अंमलबजावणी यंत्रणा निहाय ₹ २७.२९ कोटी निधीचे अनुसूचित जाती करिता वितरण

वर्ष- २०१७-१८ (रक्कम ₹ कोटी)

अ.क्र.	प्रकल्पाचे नाव	प्रकल्प मंजूरीचे वर्ष	नवीन प्रकल्पांची किंमत / जुन्या प्रकल्पांची उर्वरीत किंमत	मागील वर्षापर्यंत वितरीत निधी	सन २०१७-१८ करिता उर्वरित प्रकल्प किंमत	अनुसूचित जाती प्रवर्गासाठी मंजूर केंद्र व राज्य हिस्स्याचे मिळून एकूण निधी वितरण
१	एक डोळा पद्धतीने ऊसाचे बेणे निर्मितीसाठी रोपवाटिका स्थापन करणे	२०१७-१८	१५.१५	०.००	१५.१५	०.७२
अ.	**संचालक (विस्तार व प्रशिक्षण)**		**१५.१५**	**०.००**	**१५.१५**	**०.७२**
२	उन्नत शेती - समृद्ध शेतकरी मोहिम अंतर्गत यांत्रिकीकरण प्रकल्प	२०१७-१८	१००.००	०.००	१००.००	१०.२८
ब.	**संचालक (गुणवत्ता व नियंत्रण)**	**एकूण**	**१००.००**	**०.००**	**१००.००**	**१०.२८**
३	शेत तळयांच्या अस्तरीकरणाकरिता अर्थसहाय्य	२०१६-१७	२५.००	०.००	२५.००	२.५७
४	फलोत्पादनाच्या यांत्रिकीकरणाकरिता अर्थसहाय्य	२०१६-१७	२५.००	१३.११	११.८९	१.२२
५	संरक्षित शेती प्रकल्प	२०१७-१८	५०.००	०.००	५०.००	५.१४
६	कांदाचाळ प्रकल्प	२०१७-१८	५०.००	०.००	५०.००	५.१४
क.	**संचालक (म.रा.फ. व औ. मं.)**	**एकूण**	**१५०.००**	**१३.११**	**१३६.८९**	**१४.०७**
ड.	**आयुक्त (कृषी) (अ + ब + क)**	**एकूण**	**२६५.१५**	**१३.११**	**२५२.०४**	**२५.०७**
७	कृत्रिम रेतन सुविधा प्रकल्प	२०१५-१६	२५.३६	९.७८	१५.५८	१.६०
८	बहुवार्षिक चारा पिकांची लागवड आणि मुरघास निर्मिती प्रकल्प	२०१६-१७	४.१३	२.१३	२.००	०.२१
इ	**आयुक्त (पशुसंवर्धन)**	**एकूण**	**२९.४९**	**११.९१**	**१७.५८**	**१.८१**
९	गुणवत्तापूर्व बिजोत्पादनाव्दारे महाराष्ट्रामध्ये टसर विकास प्रकल्प	२०१४-१५	३.२७	२.२१	१.०६	०.११
१०	महाराष्ट्रात रेशीम उद्योग विकासासाठी तुतीची योजना प्रकल्प	२०१५-१६	८.३६	२.२९	६.०७	०.२०
११	रेशीम किटक उत्पादनासाठी संगोपन गृहांची उभारणी प्रकल्प	२०१६-१७	१०.९८	५.८१	५.१७	०.१०
ई	**संचालक (रेशिम)**	**एकूण**	**२२.६१**	**१०.३१**	**१२.३०**	**०.४१**
	एकूण (ड + इ + ई)		**२९४.६४**	**२५.०२**	**२६९.६२**	**२७.२९**